College Code : 696

Sharad Gramin Bahuudeshiya Shikshan Sanstha, Deoli

# MARIYA ARTS AND SCIENCE COLLEGE, DEOLI

(Recognized by Govt. of Maharashtra & Affiliated to R.T.M. Nagpur University, Nagpur)

Mariya Campus, Near Tahsil Office, Pulgaon Road, Dist. Wardha -442101

Ph.: 9579190333 email:mariyacollegedeoli@gmail.com www.mariyacollegedeoli.com

लोकमत

## जगण्याचे प्रयोजन सिद्ध करणारा ग्रंथ म्हणजे 'आयुष्याचा मृदगंध'

### मारिया महाविद्यालयात परिसंवाद



लोकमत न्यूज नेटवर्क

देवळी : आधुनिक युगात मानवी व्यवहारांची समीकरणे बदलली आहेत. जगण्याच्या सर्वच पातळ्यांवर नव्या प्रश्नांची भर पडली आहे. दिवसागणिक होत असलेले बदल व्यक्तीला संभ्रमित करत आहेत. अशा अवस्थेत नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे प्रा. सचिन सावरकर लिखित आयुष्याचा 'मृदगंध' हा लेख संग्रह मानवतेच्या विचारांचा गंध पसरवणारा व मानवी जगण्याचे प्रयोजन सिद्ध करणारा ग्रंथ आहे, असे विचार परिसंवादात सहभागी वक्त्यांनी व्यक्त केले. स्थानिक मारिया कला व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागातर्फे प्रा. सचिन सावरकर यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या आयुष्याचा मृदगंध या पुस्तकावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश बनकर होते.

परिसंवादात महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा विशाखा लोहकरे, प्रा. रत्नमाला मुंदडा, प्रा. संजय सुरसे यांनी सहभाग घेतला होता. परिसंवादाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रकाश बनकर यांनीही विचार व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला लेखक प्रा. सचिन सावरकर यांनी पुस्तकाच्या प्रती भेट दिल्या. कार्यक्रमाला प्रा. अनुप झाडे, प्रा. सिद्धार्थ वानखेडे, प्रा. दुर्गेश पोटे, प्रा. शिरीन शेख, प्रा. नीलेश शेंडे आदींसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.